अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

MO.9860898564

संपादक - दिपक थोरात



टाकरवण :- राम आडागळे
माजलगांव तालुक्यातील टाकरवण याठिकाणी ग्रामपंचायत निवडनुकीचे आज मतदान पार पडत असुन दुपार पर्यत शांततेत मतदान झाले.याच मतदान प्रक्रियत पाच बुध आसुन या पाचही बुथवर सकाळ पासुन मतदारीनी मतदाना करता गर्दी केली होती यावेळी मतदार बुथ वर पोलिस बंधोबस्त देखील तगडा होता.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -४८ | रविवार दि.०५ नोव्हेंबर २०२३ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -48 | SUNDAY DT. 05 NOVEMBER 2023 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

## बडी देर कर दी मेहेरबाँ आते आते...!

# घटना घडून सहा दिवस उलटले, आज पालकमंत्री ना.मुंडे उडत्या पाखराची पिसे का मोजताहेत?

## पालकमंत्र्यांना घटनेचे गांभिर्य नव्हते का? जिल्हा वाऱ्यावर सोडला होता!

बीड जिल्ह्यामध्ये जाळपोळीनंतर बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी संबंधित घटना घडल्यानंतर पालकमंत्री या नात्याने चार ते पाच दिवसानंतर संबंधित प्रतिक्रिया का दिली या ठिकाणी धनंजय मुंडे यांनी भेट दिली असताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या कॉलेज परिसरामध्ये बसण्याची व्यवस्था व पत्रकार परिषदेसाठी काही नियोजन करण्यात आले होते पण धनंजय मुंडे यांनी प्रतिक्रिया दिल्यामुळे त्या ठिकाणी पत्रकारांना न बोलतात निघून गेले असताना जात असताना काही कार्यकर्त्यांच्या भावना त्या ठिकाणी जयदत्त क्षीरसागर समर्थकांनी बोलून दाखवल्या की पालकमंत्री साहेब आमचं म्हणणं आहे का आमच्या भावना समजून घ्या.

पालक मंत्री धनंजय मुंडे यांनी संबंधित कार्यकर्त्यांच्या भावना ऐकून घेत भावना पुढील ठिकाणी निघाले तर पण या ठिकाणी बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी एवढ्या उशिरा बीडला व संबंधित उशिरा भेट का दिली. त्या ठिकाणी आज रोजी धनंजय मुंडे यांनी भेट दिली पण या अगोदर मुंबईसारख्या ठिकाणी राहून त्यांनी माध्यमातून प्रतिक्रिया का दिल्या नाहीत तर आज एसआयटी मार्फत चौकशी करण्याचे निर्देश धनंजय मुंडे हे देणार आहेत नामदार धनंजय मुंडे यांनी बीड जिल्हा पोलीस प्रशासन व जिल्हाधिकारी यांना या अगोदर सूचना दिल्या होत्या किंवा नाही याचाही प्रश्न पडत आहेत तर या ठिकाणी पालकमंत्री म्हणून त्यांनी घटना झाल्या झाल्या बीड येथे येणे गरजेचे असताना व मुंबई येथून पत्रकार परिषद घेऊन संबंधित यंत्रणा हलविणे गरजेचे होते तर पत्रकार परिषद घेऊन माध्यमांच्या समोर त्यांची भूमिका स्पष्ट करणे गरजेचे असताना चार ते पाच दिवसांनी आज रोजी ना.धनंजय मुंडे

(पान ३ वर...)



### घर जाळून आंदोलकांच्या मागण्या पूर्ण होणार आहेत का ?

पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी बीड येथे माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या संपर्क कार्यालयाला आगीची तसेच झालेल्यांची पाहणी केली याबरोबरच त्यांनी बार्शी रोडवरील राष्ट्रवादी काँग्रेसची पाहणी करण्यासाठी आपला तापाने ला मात्र त्याठिकाणी राष्ट्रवादी भवन बंद असल्यामुळे ते बाहेरून पुढे माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभेचे अध्यक्ष डॉक्टर योगेश शिरसागर यांच्या नगर रोडवरील निवासस्थानी पोहोचले त्या ठिकाणी त्यांनी झालेल्या जाळपोळीची तसेच तोडफोडीची पाहणी करत डॉक्टर योगेश शिरसागर यांच्याकडून घटनेची माहिती जाणून घेतली

बीड शहरातील हिंसाचाराची पाहणी केल्यानंतर पालकमंत्री धनंज मुंडे यांनी 'शिवछत्र' या पंडीत कुटूंबाच्या निवासस्थानी पत्रकार परिष घेतली. मुंडे म्हणाले, बीडमध्ये ज्या पद्धतीने दुर्दैवी घटना घडल्या तशा कधीच घडल्या नव्हत्या. अर्थाचा अनर्थ काढून जिल्हा पेटविण्याच प्रयत्न समाजकंटकांनी केला. आतापर्यंत कधी कोणाच्या घरापर्यंत पोहचले नव्हते. घडलेल्या घटनेचा निषेध. जो घटनाक्रम आहे, त्यावरू हे फार मोठे षडयंत्र असल्याचे स्पष्ट आहे.

# एकनाथ खडसे यांना हृदयविकाराचा झटका

## मुख्यमंत्र्यांकडून तातडीने एअर ॲम्बुलन्सची व्यवस्था



**राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार आणि ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांना हृदयविकाराचा झटका आल्याची माहिती समोर येत आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना याबाबत फोन येताच त्यांनी एकनाथ खडसे यांच्यासाठी एअर एम्ब्युलन्सची व्यवस्था करण्याचे आदेश दिले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सध्या साताऱ्यातील त्यांच्या गावी आहेत.**

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आमदार एकनाथ खडसे यांना हृदयविकाराचा झटका आल्याचे वृत्त आहे. एकनाथ खडसे यांच्या उपचारासाठी तातडीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एअर ॲम्बुलन्सची व्यवस्था केली आहे. एकनाथ खडसे यांच्या कन्या रोहिणी खडसे यांनी मुख्यमंत्र्यांसोबत संपर्क साधला होता.त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी तातडीने एअर ॲम्बुलन्सची व्यवस्था केली. खडसे यांना उपचारासाठी जळगावहून मुंबईला दाखल करण्यात येणार असल्याची माहिती आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सध्या साताऱ्यातील त्यांच्या दरे या गावी आहेत. खडसे यांच्या प्रकृतीबाबतची माहिती समजताच त्यांनी तातडीने एअर ॲम्बुलन्सची व्यवस्था केली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे त्यांच्या गावी शेतात फेरफटका मारत असतानाच त्यांना एकनाथ खडसे यांच्या प्रकृतीबाबत माहिती समजली. फोन येताच मुख्यमंत्री शिंदे यांनी तात्काळ एअर एम्ब्युलन्सची व्यवस्था करण्याबाबत आदेश दिले. दरम्यान, एकनाथ खडसे यांच्यावर जळगावच्या गजानन हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहे. आज संध्याकाळी ७.३० वाजता खडसेंना पुढील उपचारासाठी जळगावहून मुंबईसाठी उड्डाण करणार आहेत.

# रेल्वेलाईनच्या दुहेरी कामाचा श्रीगणेशा खा.डॉ प्रीतम ताई मुंडे बीड जिल्ह्यात रस्त्याचे जाळे विणले



बीड (प्रतिनिधी)

जिल्ह्याच्या खा. प्रीतमताई मुंडे यांनी बीड जिल्ह्यात ज्याप्रमाणे महामार्गांचे जाळे विणले अगदी त्याचप्रमाणे रेल्वे लाईनचेही जाळे त्या बीड जिल्ह्यात निर्माण करत आहेत. त्यांच्या माध्यमातूनच आता मराठवाड्यातील चौथ्या रेललाईन दुहेरीकरणाच्या कामाचा श्रीगणेश झाला आहे. परभणी- परळी वैजनाथ या ६४ किमीच्या रेल्वे मार्ग दुहेरीकरणाच्या जमिन अधिग्रहणाची अधिसुचना रेल्वे मंत्रालयाकडून नुकतीच जारी करण्यात आली आहे. यासाठी खा. प्रीतमताईंनी सातत्याने प्रयत्न केले होते, या रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणाचा परळीसह बीडकरांना मोठा फायदा होणार आहे. या दुहेरीकरणामुळे नविन रेल्वेच्या गाड्याही भविष्यात वाढणार आहेत. तसेच खा. प्रीतमताईंच्याच नेतृत्वात सध्या नगर- र- बीड-परळी रेल्वेचेही काम प्रगतीपथावर आहे.

हेही काम लवकरच पुर्ण होईल, असे रेल्वे विभागाकडून सांगितले जात आहे. त्यामुळे लवकरच नगर-बीड-परळी रेल्वे मार्गावरून बीडकरांना प्रत्यक्ष रेल्वे धावताना पहायला मिळणार आहे. नगर-बीड-परळी हा रेल्वे मार्ग बीडकरांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा आहे.

त्यामुळे हा मार्ग कोणत्याही परिस्थिती पुर्ण करायचाच असा चंग माजी मंत्री लोकनेत्या पंकजाताईंच्या मार्गदर्शनाखाली खा. प्रीतमताईंनी बांधलेला आहे. त्याअनुषंगानेच या रेल्वे मार्गाच्या कामात ज्या ज्या वेळी अडचणी येतील त्या त्यावेळी त्या अडचणी सोडविण्यासाठी खा. प्रीतमताई आपल्या जिवाचे रान करीत आहेत.

**यासाठीही खा. प्रीतमताईंनी सातत्याने प्रयत्न केले होते, या रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणाचा परळीसह बीडकरांना मोठा फायदा होणार आहे. या दुहेरीकरणामुळे नविन रेल्वेच्या गाड्याही भविष्यात वाढणार आहेत.**

परभणी- परळी वैजनाथ या ६४ किमीच्या रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरणाच्या जमिन अधिग्रहणाची अधिसुचना रेल्वे मंत्रालयाकडून नुकतीच जारी करण्यात आली आहे.

त्यामुळेच सध्या अहमदनगर-बीड-परळी वैजनाथ रेल्वेचे काम प्रगतीपथावर असून लवकरच हे काम पूर्ण होणार असल्याचे मध्य रेल्वेने प्रसिद्धीस दिले आहे. सेंट्रल रेल्वेने एप्रिल २०२३ पासून आजपर्यंत १४७.७७ किमी मल्टीट्रॅकिंग (नवीन लाइन/ दुहेरी / ३री / ४थी लाईन) पूर्ण केली. ३८८६.९५ डीं ने या वर्षात नवीन ओळी/दुहेरी / ३री/चौथी लाईनसाठी नियोजन केले. हा ४८०५.१७ कोटींचा प्रोजेक्ट असून आतापर्यंत ३६९९ कोटींचा खर्च झाला आहे. आतापर्यंत अहमदनगर ते आष्टी (६६.१८ किमी) पर्यंत काम पुर्ण झालेले आहे. या आर्थिक वर्षात आष्टी ते गनवाडी असे ६६.१२ किमीचे पुर्णत्वास जात आहे. इगनवाडी ते परळी १२७.९५ किमी एवढे अंतर असून हेही काम लवकरच पुर्ण होणार असल्याचे रेल्वेकडून सांगितले जात आहे. ही लाईन पुर्ण झाल्यास नगर आणि बीड जिल्ह्याचा संपर्क सुधारेल आणि या क्षेत्राचा सामाजिक आणि आर्थिक विकास होण्यास मोठी मदत होणार आहे. याचप्रमाणे आता मराठवाड्यातील चौथ्या रेललाईन दुहेरीकरणाच्या कामाचाही श्रीगणेश झाला आहे.



## आमदार शिरसाट यांच्याकडून रस्त्यावर उतरण्याचा इशारा

# पाणी प्रश्न पेटणार!

पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालकांनी ८.५ टीएमसी पाणी सोडण्याचे आदेश काढूनही नगर-नाशिक विभागातील राजकीय दबावामुळे जायकवाडी धरणात पाणी सोडण्यात येत नसल्याचा आरोप होत आहे. दरम्यान, आता याच पाणी प्रश्नात शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी उडी घेतली आहे. मराठवाड्याला त्याच्या हक्काचं पाणी मिळालं पाहिजे, यासाठी आता रस्त्यावर उतरणार असल्याचा इशारा शिरसाट यांनी दिला आहे. सोबतच न्यायालयात देखील न्यायालयीन लढाई लढणार असल्याचं शिरसाठ म्हणाले आहे.

### नवीन धरणाला विरोध...

पुढे बोलतांना शिरसाट म्हणाले की, पाण्यासाठी आडवे येत आहे त्यांना इशारा देत असून, आम्ही देखील।लढा उभा करणार आहे. तसेच, वरील नवीन धरण बनू नयेत अशी आमची मागणी आहे. आहेत त्या धरणातून पाणी सोडले जात नाही, त्यामुळे नवीन धरणं झाल्यावर आणखी पाणी अडवले जाईल.

### आपला मुलगा मुख्यमंत्री व्हावा, प्रत्येक आईची भावना...

दरम्यान याचवेळी शिरसाट म्हणाले की, अजित दादा यांच्या आईनी त्यांच्या मुला बद्दल मुख्यमंत्री होण्याची भावना व्यक्त केली आहे. प्रत्येक आई अशी भावना व्यक्त करते. माझा मुलगा मुख्यमंत्री व्हावा असे सर्वच आईला वाटते,असे शिरसाट म्हणाले. तर, जनता आता आंदोलनाला कंटाळली आहे. त्यामुळे गुणरत्न सदावर्ते यांनी आता आंदोलन केले तर, त्यांना जनतेच्या रोषाला सामोरे जावे लागेल,असेही शिरसाट म्हणाले.



**मराठवाड्याला पाणी मिळाले पाहिजे अशी आमची मागणी आहे. न्यायालयाने देखील आदेश दिला आहे, पण काही लोकांचा याला विरोध आहे. आमच्या हक्काचं पाणी द्यावे आणि न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार पाणी देण्यात यावे. तर, हक्काचे पाणी मराठवाड्याला मिळावे यासाठी आम्ही देखील न्यायालयात जाणार असून, वकिलांची फौजी उभी करणार आहे. आम्हाला आता लढा उभा करावं लागणार असल्याचे शिरसाट म्हणाले आहे.**

# मनोज जरांगे करणार महाराष्ट्राचा दौरा

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील हे पुन्हा महाराष्ट्राचा दौरा करणार आहेत. उद्या किंवा परवा ते याबाबतची घोषणा करणार आहे. तसेच, सरकारचे शिष्टमंडळ उद्या सोमवारी मनोज जरांगेंची पुन्हा रुग्णालयात जाऊन भेट घेणार आहे. मराठा आरक्षणाची डेडलाईन कोणती याबाबत शिष्टमंडळ चर्चा करणार असल्याची माहिती मनोज जरांगेंनी दिली आहे. त्यांनी आज सकाळी माध्यमांशी संवाद साधला.

### उद्या सरकारचे शिष्टमंडळ पुन्हा घेणार भेट, मराठा आरक्षणाच्या डेडलाईनबाबत चर्चा करणार

आता चांगले दिवस मनोज जरांगेंवर सध्या छत्रपती संभाजीनगरच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. आज माध्यमांशी संवाद साधताना मनोज जरांगे म्हणाले, माझी तब्येत आता चांगली आहे. मी ठणठणीत आहे. कुणीही काळजी करु नये. मात्र, आता आरक्षण मिळाल्याशिवाय आपण शांत बसणार नाही. आतापर्यंत मराठा समाजावर खूप अन्याय झाला आहे. आता चांगले दिवस आले आहे. आरक्षण



मिळण्याचा दिवस जवळ येत आहे. जोपर्यंत आरक्षण मिळत नाही, तोपर्यंत आपले आंदोलन सुरुच राहणार आहे.

# हंगामी वस्तीगृहाविना ऊसतोड मजुरांच्या पाल्यांची परवड

## ऊसतोड मजूर फडात , वस्तीगृहासाठी आकडेमोड कागदावरच :- डॉ.गणेश ढवळे

बीड (प्रतिनिधी)

ऊसतोड मजुरांसोबत विद्यार्थ्यांचे होणारे स्थलांतर रोखण्यासाठी मागील अनेक वर्षांपासून बीड जिल्हा परिषदेच्या वतीने समग्र शिक्षा अभियान अंतर्गत हंगामी वस्तीगृह योजना राबविण्यात येते.ऊसतोड मजुर ऊसाच्या फडात पोहोचले आहेत मात्र अद्याप वस्तीगृहासाठी आकडेमोड सुरू असल्याने अद्याप वस्तीगृहे सुरू न केल्याने विद्यार्थ्यांना घरी जेवणाची सोय नसल्याने स्थलांतर करावे लागत असुन जिल्हा परिषद यंत्रणेकडून हंगामी वस्तीगृहे सुरू करण्यास उशीर लागत असल्याने याचा फटका विद्यार्थ्यांना बसत असुन तातडीने हंगामी वस्तीगृहे सुरू करण्यात यावीत आणि दिरंगाई करणा-या संबंधित जबाबदार आधिका-यांवर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, प्रधान सचिव, महिला व बालविकास मंत्री यांना केली असुन ऊद्या दि.६ सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

गटशिक्षणाधिकारी यांनी शिक्षणाधिका-यांकडे दिलेल्या अहवालानुसार आष्टी, पाटोदा आणि बीड वगळता इतर ८ तालुक्यातुन १९७ वस्तिगृहे सुरू करण्याची गरज असुन यात २१२९४ विद्यार्थी लाभ घेतील असे म्हटले आहे.मागील काही वर्षांपासून ऊसतोड मजुर दिवाळी झाल्यानंतर फडात जात होते,मात्र यावर्षी पाऊस नसल्याने साखर कारखाने

तालुका मुले ३५९ ,मुली ३९० एकुण ७४९ वस्तिगृह संख्या ७ , धारूर तालुका मुले ५५५०, मुली ५३५५ एकुण १०९०५ वस्तीगृह संख्या ८४ , गेवराई तालुका मुले २४७ ,मुली २४८ एकुण ५३१ वस्तीगृह संख्या ७ ,केज तालुका मुले १४२७ मुली १५१३ एकुण २९४० वस्तीगृह संख्या २९, माजलगाव तालुका मुले १५५९,मुली १४६३ एकुण ३०२२ वस्तीगृह संख्या २७ , परळी तालुका मुले ४१०,मुली ४५७ एकुण ८६७ वस्तीगृह संख्या १५, शिरूर तालुका मुले १४६,मुली १५१ एकुण २९७ वस्तीगृह संख्या ५ आणि वडवणी मुले १०२९ मुली ९५४ एकुण १९८३ असे एकंदरीतच १०७२७ मुले,१०५६७ मुली एकुण २१२९४ लाभार्थी असुन त्यासाठी १९७ वस्तीगृहे सुरू करण्याची गरज आहे.



लवकर सुरू करण्यात आले आहेत परीणामी ऊसतोड मजुर ऊसाच्या फडात पोहोचले आहेत मात्र अद्याप वस्तीगृहासाठी प्रशासनाची कागदावरच आकडेमोड सुरू असुन वस्तीगृहे सुरु न केल्याने विद्यार्थ्यांची आबाळ होत आहे. यात संभाव्य लाभार्थी संख्या, वस्तीगृह संख्या खालिल प्रमाणे आहे.अंबेजोगाई दोन वर्षांपूर्वी प्रति विद्यार्थ्यांसाठी सहा महिन्यांसाठी ८५०० रूपये दिले जायचे त्यानुसार प्रति विद्यार्थी दिवसाकाठी ४७ रुपये निधी मिळत होता

## युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या युवा आघाडी जिल्हा उपाध्यक्ष पदी हरिओम क्षीरसागर यांची निवड

बीड (प्रतिनिधी)

बीड तालुक्यात असणारे लिंबागणेश गाव हे सध्या प्रत्येक विषयात चर्चेत असुन गावातील युवक प्रत्येक क्षेत्रात आपल व आपल्या गावचं नाव लौकीक करत आहेत. तसेच येथील रहिवासी असणारे युवा पत्रकार हरिओम क्षीरसागर हे आपल्या गावात असणाऱ्या प्रत्येक प्रश्नांकडे त्यांचे बारीक लक्ष असते . गावाचे नाव मोठे होण्यापेक्षा गाव मोठे व्हावे मग नाव आपोआप मोठे होते या तत्त्वावर चालणारे तसेच ग्रामीण



क्षेत्राशी नाळ जोडलेली असल्यामुळे सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असणारे असे त्यांची ओळख आहे . युवा ग्रामीण पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. गणेश कचकलवार यांनी त्यांच्या सामाजिक तसेच निर्भिड पत्रकारिता या कार्याची दखल घेऊन त्यांना युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या युवा आघाडी बीड जिल्हा उपाध्यक्ष पदी नियुक्ती पत्र देऊन निवड केली.

गोरगरीब, शेतमजुर, अन्यायाला वाचा फोडण्यासाठी तसेच पत्रकारांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहण्यासाठी हि संघटना संपुर्ण राज्यात काम करत आहे . अशीच कामे आपल्या हातुन घडावी असे मा. गणेश कचकलावर म्हणाले याच वेळी नियुक्ती पत्र मिळताच त्यांच्या मित्र परिवाराकडून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत असुन यावेळी हरिओम क्षीरसागर म्हणाले की जी जबाबदारी माझ्यावर राष्ट्रीय अध्यक्षांनी दिली आहे ती चांगल्या प्रकारे पार पाडून अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्याचा प्रयत्न करीत राहील.

## पेठ बीड भागातील विविध समस्या न.प.ने तात्काळ सोडवाव्यात...भेय्या साळवे



बीड (प्रतिनिधी)

बीड शहारातील पेठ बीड,एकता नगर भागामध्ये नगरपालिकेचे दुर्लक्ष असल्याचे दिसत आहे.हा भाग विविध समस्याच्या विळख्यात सापडले आहे.घंटा गाडी येत नसल्याने जागोजागी काचऱ्याचे ढीग दिसत आहेत,नाल्या वेळेवर काढत नसल्याने नाल्या तुंबून रस्त्यावर पाणी येत आहे,डेंग्यू चे रुग्ण वाढत असताना या भागात धूर फवारणी तसेच जन्तू नाशक फवारणी झाली नसल्याने डेंग्यू च्या रुग्णात वाढ होत आहे.

या भागातील मुख्य बऱ्याच खांबावरील पथदिवे बंद आहेत,त्याची दुरुस्ती होणे आवश्यक असताना जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत आहे असेच चित्र पहावया मिळत आहे.चौकात,मुख्य रस्त्यावर मोकाट जनावरे ठाण मांडून बसलेले असतात, त्यामुळे बरेच अपघात झाले असून त्याना कोंडवाड्यात टाकुले पाहिजे तसेच कुत्र्याचे झुंड चे झुंड मुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.या आधी बऱ्याच लहान मुलांना,नागरिकांना चावा घेतला आहे,कुत्र्याचा बंदोबस्त करणे आवश्यक असताना नगरपालिकेचे हाथाची घडी आणि तोंडावर बोटअसे म्हणावे लागेल.या भागात घंटा गाडी बंद आहे, जागोजागी कचऱ्याचे ढीग साचले असून त्याची दुर्गंधी पसरत आहे.त्यामुळे विविध साथीच्या रोगास निमंत्रण होत आहे.



बीड (प्रतिनिधी)

पीपल्स रिपब्लीकन पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.जोगेंद्र कवाडे राष्ट्रीय कार्याध्यक्ष जयदिप कवाडे यांच्या हस्ते दि.३० ऑक्टों. २०२३ रोजी बीड शहरातील तरुण कार्यकर्ते शेख निसार यांची बीड शहर उपाध्यक्ष पदी पुष्पगुच्छ देऊन निवड करण्यात आली. यावेळी शेख अखील, शेख माजेद, फयीज महंमदखान उर्फ पापाभाई, शेख परवेज, अफान खान, सय्यद साबेर, शेख रफीक, शेख इफ्तेखार, शेख शादाब, शेख अतीख, शेख अफरोज इत्यादींनी पीपल्स रिपब्लीकन पार्टीत जाहीर प्रवेश केला. यावेळी शहराध्यक्ष शेख फेरोज, जिल्हाध्यक्ष अनिल तुरुकमारे यांनी सर्वांचे अभिनंदन केले असुन पुढील वाटचालीस हार्दीक शुभेच्छा दिल्या.

## जलजीवन बाबत विधी मंडळ समितीच्या अहवालानुसार तात्काळ कार्यवाही करा-अशोक तावरे




तसेच विधी मंडळ समितीने देखील चौकशी करुन या प्रकरणी गुत्तेदार, अधिकारी आणि सर्व्हे करणार्या तांत्रिक सल्लागारांच्या विरोधात अहवाल दिला असल्याने या लोकांच्या विरोधात तात्काळ गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया पार पाडावी अशी मागणी मनसेचे राज्यउपाध्यक्ष अशोक तावरे यांनी जिल्हा परिषद मुख्याधिकारी अविनाश पाठक यांच्याकडे केली आहे.

या बाबत अशोक तावरे यांनी मुख्याधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बीड जिल्ह्यातील सुमारे १३०० गावांना पिण्याचे पाणी मिळावे म्हणून जलजीवन मिशन नावाची योजना बीड जिल्ह्यात जिल्हा परिषदेमार्फत राबवण्यात येत आहे. या योजने अंतर्गत ३६७ कामांना कार्यारंभ आदेश देवून ही योजना सुरु करण्यात आली. परंतु या योजनेतील कामा बाबत प्रचंड अनियमितता झालेली असून पात्रता नसणार्या तसेच गुणवत्ता प्रमाणपत्र नसणार्या लोकांना कामे देणे, नोंदणीकृत ठेकेदारांना वित्तीय मर्यादेपेक्षा जास्त रक्कमेची कामे देणे, ठेकेदारांच्या निविदा मिळविण्यासाठीच्या कागदपत्रात पारदर्शकता नसणे, ठरावीक कंत्राटदारांनाच काम देणे, अधिकार्यांनी आपल्या नातेवाईकांना काम देणे, न केलेल्या कामाचे पैसे देणे तसेच खोदकामाचे अंतर वाढवून पैसे उचलणे, ज्यांनी या योजनेचा सर्व्हे केला आहे अशा लोकांना कामे देणे अशा प्रचंड चुका करुन चुकीच्या लोकांच्या पाठीशी उभा राहण्याचे काम तत्कालीन मुख्याधिकारी अजित पवार यांनी केलेले आहे.

यातील गेवराई तालुक्यातील अंतरवली, नागझरी तसेच बीड तालुक्यातील बोरखेड येथील कामे करणार्या ठेकेदारांनी तर या योजनेचे अक्षरश: वाट लावून टाकलेली आहे. जिल्ह्यातील जवळपास सर्व राजकीय पक्ष आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी या बाबत मुख्याधिकारी, जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त, पालकमंत्री यांच्या पर्यंत तक्रारी केल्या. सर्व वर्तमानपत्रांनी अनेक वेळा या बाबतचे वृत्त प्रकाशित केलेले आहेत. जिल्हाधिकार्यांनी या तक्रारीतील सत्य तपासण्यासाठी सहा अधिकार्यांची चौकशी समिती देखील नियुक्त केली. या समितीने जलजीवन योजनेची निविदा प्रक्रिया आणि काम घेणारे गुत्तेदार हे सदोष असल्याचा व त्यावर कार्यवाही अपेक्षित असल्या बाबतचा अहवाल दिलेला आहे. त्यानंतर विधीमंडळ समितीने (पलांडे मॅडम) देखील या सर्व प्रकरणावर अहवाल दिला असून दोषींवर गुन्हे दाखल करुन तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना केलेल्या आहेत. बीड जिल्ह्यातील ज्या गावात ही योजना मंजूर झालेली आहे. त्यातील ७० टक्के गावात या योजनेचे काम हे सदोष पध्दतीने सुरु असून या योजनेच्या मुळ हेतुस बाधा येणार अशा पध्दतीनेच कामे सुरु असून केवळ गुत्तेदाराचे भले होण्याच्या दृष्टीने हे सर्व काम निकृष्ट पध्दतीने सुरु आहे. गुत्तेदारांचा हा सर्व मुजोरपणा तत्कालीन मुख्याधिकारी अजित पवार यांनी चुकीच्या पध्दतीने पाठराखण केल्याने वाढलेला आहे. त्यामुळे कितीही बातम्या छापून आल्या आणि चौकश्या झाल्या आपले काही वाकडे होणार नाही या भ्रमात हे सर्व गुत्तेदार असून हे सर्व पाप तत्कालीन मुख्याधिकारी अजित पवार यांनी केलेले आहे. त्यावर पडदा न टाकता विधी मंडळ समितीच्या अहवालानुसार दोषी अधिकारी, कर्मचारी, अपात्र आणि मुजोर गुत्तेदार यांच्यावर तात्काळ कार्यवाही करावी नसता जिल्हा परिषदे समोर या जलजीवन मिशनच्या कामातील सदोष कामांचे चित्र प्रदर्शन भरवून आपण आंदोलन करणार असल्याचे मनसेचे राज्यउपाध्यक्ष अशोक तावरे यांनी मुख्याधिकारी अविनाश पाठक यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

## श्रीराम कथेत बंधूप्रेमाचे अदभूत दर्शन - रामायणाचार्य - ह.भ.प.रामराव महाराज ढोक

### चकलंबा येथे प्रभु श्रीरामचंद्रांच्या राज्याभिषेकाने झाला रामकथेचा समारोप

गेवराई (प्रतिनिधी)

मानवी जीवनातील समस्या, प्रश्न व अडचणीवरील समर्पक उत्तर म्हणजे रामायण कथा आहे. जीवनातील कठीण प्रसंगांना सामोरे जातांना त्यातील उकल करण्यासाठी रामायण कथा मार्गदर्शक ठरते. जीवनातील व्यथा दूर सारून शांती निर्माण करुन जीवन सुखमय करण्यासाठी राम कथा आहे. तसेच श्रीराम कथेत बंधूप्रेमाचे अदभूत दर्शन घडते. रामायण कथेपासून आपण उर्जा घेऊन वागले पाहिजे असे प्रतिपादन रामायणाचार्य ह.भ.प.रामराव ढोक महाराज यांनी चकलंबा येथे सुरु असलेल्या तुलसी रामायण कथेच्या सांगता प्रसंगी बोलताना व्यक्त केले.

गेवराई तालुक्यातील चकलंबा येथील



विघ्नहर्ता श्री गणेश मंदिर येथे रौप्य महोत्सवी अखंड हरिनाम सप्ताह व विश्वविख्यात श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी सामुदायीक पारायण तथा संगीत तुलसी रामकथा ज्ञानयज्ञ सोहळ्यात आयोजित करण्यात आलेल्या रामकथा ज्ञानयज्ञाचा समारोप झाला. रावण वध व प्रभु श्री रामचंद्रांच्या रामराज्याभिषेक यावर रामायणाचार्य ह.भ.प.रामराव महाराज ढोक यांनी आपल्या अमृततुल्य वाणीतून रामकथेचा समारोप रामराज्याभिषेकाचा प्रसंग उभा करत केला. यावेळी श्रीक्षेत्र गोरक्षनाथ संस्थानचे महंत दत्ता महाराज गिरी, माऊली संस्थानचे महंत नामदेव महाराज शेकटेकर, जेष्ठ पत्रकार शिवाजी मामा ढाकणे, नारायण नागरे, व्हॉईस ऑफ मीडियाचे तालुकाध्यक्ष विनोद पौळ, महानोर यांच्या सह महिला व पुरुष भाविक भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. तर यावेळी कथा संयोजक परमेश्वर महाराज वाघमोडे यांनी ढोक महाराजांचा सत्कार केला.

ढोक महाराजांनी तब्बल ७२ दिवसाचे युद्ध....रावण त्वेषाने पेटली वानर सेना...प्रभु रामचंद्राचे आशिर्वादाचे बळ... सागरात उभारलेला सेतू..बिभीषणाची सत्याबरोबर दिलेली साथ.लक्ष्मणाला लागलेली शक्ती... घनघोर युद्ध...अनेक वानरांचा वध...कुभंकर्ण वध... इंद्रजित वध....अखेर रावणाचा वध....राजा राम राम राम....सिता राम राम राम(मंडपात रामनामाचा गजर)....विजयी रामचंद्राचे अयोध्येत आगमन... बंधुमिलन.... मातामिलन...जयजयकार आणि करुणेचा प्रसंगात प्रभु रामचंद्राचा राज्याभिषेक..आणि कथायज्ञाचा समारोप झाला. शेवटी मान्यवरांच्या उपस्थितीत पवित्र रामायण ग्रंथाची आरती झाली. रामराव ढोक महाराजांनी आपल्या अमृततुल्य वाणीतून रामायण कथेतून चकलंबा आणि परिसरातील भावीक भक्तांना मंत्रमुग्ध केले.

# सरकारने आता वेळ काढूपणा करू नये

## गेवराईतील मराठा आंदोलकांच्या भावना

गेवराई । प्रतिनिधी

मराठा आरक्षणासाठी दुसऱ्या टप्प्यातील नऊ दिवस झालेल्या आंदोलनाने संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतले होते. निवृत्त न्यायमूर्ती आणि शासनाच्या शिष्टमंडळाने केलेल्या शिष्टाईमुळे मनोज जरांगे- पाटील यांनी आपले उपोषण मागे घेतले आहे. महाराष्ट्रातील सरसकट मराठा समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी त्यांनी शासनाला दोन महिन्याचा वेळ दिला आहे. त्यामुळे शासनाने आता तरी दिलेल्या वेळेत आरक्षण द्यावे, वेळ काढूपणा करू नये, अशी भूमिका गेवराई तालुक्यातील मराठा आंदोलकांनी व्यक्त केली आहे.

मराठा आरक्षणासाठी जरांगे- पाटील यांनी २५ ऑक्टोबररोजी दुसऱ्या टप्प्यातील उपोषणाला सुरूवात केली होती. त्याच दिवशी छत्रपती संभाजी महाराज यांनी जरांगे पाटील यांची भेट घेतली. मंत्री गिरीश महाजन यांनी जरांगे पाटील यांच्याशी भ्रमणध्वनीवर संपर्क साधून उपोषण मागे घेण्याची विनंती केली होती. २७ ऑक्टोबर रोजी अ‍ॅड. प्रकाश आंबेडकर यांनीही भ्रमणध्वनीवर संपर्क साधत आंदोलनाला पाठिंबा दिला होता. २८ ऑक्टोबररोजी धनगर समाजाचे बाळासाहेब दोडतले, उपोषणकर्ते सुरेश बंडगर यांनी जरांगे पाटील यांची भेट घेऊन आंदोलनास पाठिंबा दर्शविला.

### आता तरी शब्द पाळावा!

मराठा आरक्षणासाठी जरांगे- पाटील यांनी अंतरवाली सराटी येथे सुरु केलेले दुसऱ्या टप्प्यातील उपोषण सरकारकडून ६० दिवसांचा अवधी देऊन २ नोव्हेंबररोजी स्थगित केले आहे. आता सरकारने दिलेली वेळ पाळून मराठा समाजाला आरक्षण द्यावे, पुन्हा आमच्यावर उपोषण करण्याची वेळ येऊ देऊ नये, अशा भावना अंतरवाली सराटी येथील गावकऱ्यांनी व्यक्त केल्या आहेत.

### न्याय हक्कासाठी अनेक दिवसांपासून लढाई

मराठा आरक्षणासाठी अनेक दिवसांपासून लढा सुरू आहे. जरांगे- पाटील यांच्या नेतृत्वाखाली हा लढा व्यापक झाला आहे. शासनाने समितीने दिलेल्या पुराव्यांच्या आधार घेऊन मराठा समाजाला आरक्षण मिळावे. माझे वय ८० असून मी या लढ्याचा साक्षीदार होतो, यांचा मला अभिमान आहे, आमचे तर वय झाले आहे, पण पुढच्या पिढीला न्याय मिळावा.

- जनार्दन सवासे, मराठा आंदोलक, ज्येष्ठ नागरिक मादळमोही

सरकारला दोन महिन्यांची वेळ दिली आहे. आता आरक्षण मिळालेच पाहिजे, अन्यथा जरांगे - पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे आम्ही आंदोलन करू, शासनाने आता तरी मराठा समाजाला न्याय द्यावा.

- योगेश गाडे, मराठा आंदोलक गेवराई



२९ ऑक्टोबर रोजी गावोगावी अमर उपोषणाला सुरूवात झाली. आणि या दिवशी ठिक ठिकाणी उग्र आंदोलन करण्यात आले. ३० ऑक्टोबररोजी मंत्री राधाकृष्ण विखे- पाटील यांनी जरांगे यांच्याशी संवाद साधला. ३१ ऑक्टोबररोजी छत्रपती शाहू महाराज यांनी जरांगे -पाटील यांची भेट घेतली. इंटरनेट सेवा बंद झाल्याने एकच गोंधळ उडाला आणि रात्रीच्या सुमारास अंतरवली सराटीत हजारो युवक दाखल झाले. १ नोव्हेंबररोजी जरांगे - पाटील यांनी पाणी पिणे बंद केले. याच दिवशी आमदार बच्चू कडू यांनी त्यांच्याशी संवाद साधला. उपोषणाच्या नवव्या दिवशी निवृत्त न्यायमूर्ती आणि शासकीय शिष्टमंडळाने केलेली शिष्टाई कामी आली, आणि जरांगे- पाटील यांनी उपोषण मागे घेतले. जरांगे- पाटील यांच्या आदेशान्वये गेवराई तालुक्यात ठिकठिकाणी आजही साखळी उपोषण चालू आहे. लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत या साखळी उपोषणाला पाठिंबा दिला आहे. अन्न त्याग सुद्धा केला आहे. मादळमोही येथील ८० वर्षीय वृद्ध व्यक्तीही उपोषणाला बसली होती.

# मतदार संघाचा विकास करण्यासाठी प्रयत्नशील फक्त जनतेची साथ महत्त्वाची
# आ.शेखर निकम यांचे मुंबईस्थित कडवई जि.प.गट मेळाव्यात मार्गदर्शन

मुंबई ।प्रतिनिधी

चिपळूण संगमेश्वर मतदार संघातील जिल्हा परिषद गटनिहाय मुंबईकर चाकरमान्यांचे मेळावे मुंबईत घेण्याचे केलेले नियोजन यशस्वी होत असून या मतदारसंघातील राजकारणास नवीन उभारी देणारे ठरत आहे. या मेळाव्यांची सुरवात ओझरे जिल्हा परिषद या गटातील मुंबईतील ग्रामस्थ मेळाव्याच्या अलोट गर्दीने यशस्वी झाली. त्यानंतर दि. २९.१०.२०२३ रोजी कडवई जिल्हा परिषद गट व मुचरी पंचायत समिती गण हा मेळावा त्यास ठिकाणी दादर येथे महाराष्ट्रीय यादव चॅरिटी ट्रस्ट, श्रीकृष्ण मंदिर सभागृहात आमदार निकम यांच्या उपस्थितीत चाकारमान्यांच्या तुफान गर्दीने पार पडला.

आ. शेखर निकम यांनी मतदार संघातील कडवई जि. प. गट व मुचरी प. स. गणात जवळ जवळ ८३ कोटी १९ हजार रुपयांचा निधी मंजूर करुन कला, क्रिडा, सास्कृतिक, सामाजिक, शिक्षण क्षेत्राचा विकास केला आहे. रखडलेले विविध प्रकल्प आणि पर्यटनदृष्टया विकासाच्या योजना यांच्यामुळेच मतदारसघात आकार घेऊन विकासाच्या दृष्टीने वाटचाल करत आहेत. यातूनच गावात झालेली विकासकामे आणि मुंबईकर चाकरमान्यांच्या अपेक्षा जाणून घेण्यासाठी आमदार निकम यांनी मतदार संघातील जिल्हा परिषद गटनिहाय मुंबईकरांचे मेळाव्यांचे आयोजन केलेले आहे.

या मुंबईस्थित कडवई जिल्हा परिषद गट व मुचरी पंचायत समिती गण या मेळाव्यास सुद्धा चाकरमान्यांनी तुफान गर्दी झाली होती. लोकांच्या हदयात आदराचे स्थान निर्माण केले आहे त्याची प्रचिती या मेळाव्याच्या गर्दीतून जाणवत होती. जनतेला आपली सुख-दुःख जाणून घेणारा हक्काचा माणूस मिळाला आहे आणि एक आदर्श राजकारणीं मिळाल्याचे समाधान या गर्दीतून दिसत होते.

आमदार शेखर निकम यांनी मेळाव्यात मार्गदर्शन करताना म्हणाले की, आपल्या सर्वाच्या आशिर्वादाने आमदार झालो अन महामारीम नैसर्गिक आपत्ती, राजकारणातील विचित्र होणा-या घडामोडी यामुळे विकास कामे करताना खुप अडचणी आल्या. त्यातून माझ्या परिने विकास कामे केली, आपल्याशी गाठी भेटी सुद्वा होत होत्या मात्र एकत्रीत असा भेटण्याचा अन आपल्याशी विकास कामांबाबत बोलण्याचा व संवाद साधण्याचा योग येत नव्हता तो मेळाव्यात आला.



मेळाव्यातील आपल्या बहुसंख्य उपस्थितीने आपले प्रेम अनुभले. कोणत्याही आमदारास जेवढे प्रेम मिळत नसेल तेवढे प्रेम मला आपल्या कडून मिळत आहे यांचे मला समाधान वाटले.

कडवई जिल्हा परिषद गट येथे ५६ कोटी ८० लाख २५ हजार व मुचरी पंचायत समिती गण येथे रु. २६ कोटी ३९ लाखाचा निधी मिळाला आणि जो आपला विकास झाला तो प्रत्येक कार्यकर्ता शेखर निकमांमुळे झाला असे म्हणत आहेत. मात्र हा विकास माझ्या एकट्यामुळे झाला नसून मा. उपमुख्यमंत्री अजितदादा यांच्या सहकार्यामुळेच शक्य झाला आहे आणि म्हणूनच अजितदादा यांना आपण सर्वानीच कायम साथ देणे क्रमप्राप्त आहे. काही लोक म्हणतात काहीही बोलत आहेत. तस काही नसुन हा जो काही मी निर्णय घेतला तो माझ्या स्वत:साठी नसून जनतेच्या अन मतदार संघाच्या विकासाठी आहे हे तुम्ही सर्व जाणून आहात.

रस्ते, पाखाड्या झाल्या म्हणजे विकास झाला असं नाही तर शेती व पर्यटन यांचा विकास करत या माध्यमातून युवकांना नोकरी धंदे निर्माण करुन रोजगार निर्मिती झाली तरच विकास झाल्याचे सार्थक होईल. त्यामुळे गावातील लोकांनी आपल्या जमिनी विकुन आपल्याच पायावर धोंडा मारुन घेऊ नका. पाणी टंचाईसुद्धा पुर्णपणे नष्ट करण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत त्यासाठी छोटे-छोटे बंधारे बांधणे व तालुकास्तरीय छोट्या छोट्या बधा-याची दुरुस्ती करणेसाठी पाठपुरावा चालू आहे सर्व गोष्टी मा. आजितदादा पवार यांच्या माध्यमातून आपण पुर्ण करुन घेऊ शकतो आणि आपण हा विकास आगामी काळात निश्चित करु.

सांस्कृतिक, क्रिडा व शिक्षण क्षेत्रात आपणास जिथे जिथे अडचणी येतील तिथे मार्गदर्शकाप्रमाणे उभा राहुन आपणास मोलाचे सहकार्य करेन. समाज्यात वावरताना एकमेकांशी राजकीय मतभेद ठेवू नका कारण ज्यांच्यासाठी तुम्ही करता ते काही मिनीटातच एकत्र चहापान करतात. माझा आजही कोणही मोठा राजकीय मार्गदर्शक नेता नाही आणि कालही नव्हताच. सामान्य जनतेची साथ, हाच माझा विश्वास आणि ही साथ कायमची हवी आहे अशी भावनिक साद घातली.

प्रदेश सरचिटणीस दिनकर तावडे म्हणाले की एखाद्या आमदाराने जि.प. गटासाठी कोट्यावधी पेक्षा जास्त निधी खर्च करणारे आमदार शेखर निकम हे महाराष्ट्रातील एकमेव असे आमदार असतील राजकारणात नम्र असून मृदूभाषी आहेत प्रत्येकाला आपलंस वाटणारे नेतृत्व आहे. मा. आजिदादा यांचे जवळचे व आवडते आमदार आहेत. मतदार संघाचा विकास करावयाचा असेल तर अजितदादांच्या नेतृत्वाखाली काम करत त्यांना साथ देणे गरजेचे आहे असे मला वाटते.

मुंबईस्थित चाकरमान्यांनी म्हणाले प्रत्येक माणसाच्या हृदयात वेगळे स्थान व आपुलकीचे स्थान निर्माण करणा-या आमदार शेखर निकम यांना कायम खंबीरपणे साथ देऊ. यावेळी श्री. दिनकर तावडे (सरचिटणीस महाराष्ट्र प्रदेश रा.काँ.पार्टी), दिशा दाभोळकर (महिला सरचिटणीस महाराष्ट्र प्रदेश रा.काँ.पार्टी), सौ. पुजाताई शेखर निकम (माजी सभापती, पं.स.चिपळूण), श्री. राजेंद्र सुर्वे (संचालक, आरडीसी बँक रत्नागिरी), श्री. राजेंद्र पोमेडकर (रा.काँ. पार्टी, तालुका अध्यक्ष-संगमेश्वर), श्री. बाळूशेठ ढवळे (रा.काँ. पार्टी, प्रमुख संघटक, संगमेश्वर तालुका), श्री. पंकज पुसाळकर (रा.काँ.पार्टी, युवक तालुकाध्यक्ष, संगमेश्वर तालुका), नितीन भोसले, बाळा पंदेरे, मंगेश बांडागळे, गणपत चव्हाण, सुबोध चव्हाण, तुकाराम येडगे (रा.काँ.पार्टी, जिल्हा सरचिटणीस, संगमेश्वर तालुका), आण्णा पांचाळ (सायले), सुनिल कदम (फणसवळे), संतोष कांबळे (मुचरी), सिद्धार्थ सावंत (तांबेडी), संतोष घाग (काटवली), दत्ताराम शेळके (धनगर समाज अध्यक्ष), जयेश गोमाणे, संदिप मोरे, विजय घोरपडे, विजय साळुंखे, बाळकृष्ण ब्रीद, बापू ओकटे, राजू पवार, अनिल चव्हाण (शृंगारपूर), अशोक घोसाळकर, राजेंद्र ओकटे, अभय कदम (कडवई), आत्माराम करंडे, गणपत जाधव (गोळवळी), सुरेश डिके, मनोहर जाधव, बाबु हरेकर (तुरळ), हरिश्चंद्र पवार, चंद्रकांत भडवळकर (राजवाडी), महेंद्र मोहिते, विष्णू पंडव, विजय साळुंखे (चिखली), प्रदिप म्हादे (शेंबवणे), सिद्धार्थ सावंत, प्रशांत रागणेकर (रांगव), चिंतामणी कदम (शेंनवडे), निलेश खताते (शिंदे अंबेरी), सुधाकर ब्रीद (मासरंग), अनिल पवार, मिलिंद पवार (धामणी), अनिल घोरपडे, अनंत पवार (कारभाटले), सुरेश साटले, रमेश पाले (तिवरे), विश्वास तावडे (नायरी), शिवराम धांगडे, अनिल चव्हाण (शृंगारपूर), रघुनाथ घडशी (निवळी), सुरेश धांगडे (कातुर्डी), शांताराम मालप (अणदेरी), रंगराव जाधव (पाचांबे), लहु उमासरे (हेदली), भगवान कदम (कुचांबे), गणेश येडगे (राजिवली), बाबाराव कोंडविलकर, श्रीपत सुर्वे, श्रीकांत साळवी (कुळ्ये), दत्ताराम घडशी, दिलीप धामणे (विघ्रवली), संतोष घाग (काटवली), विजय पांचाळ (सायले), प्रमोद खेडेकर, सिताराम मोहिते, रुपेश कांबळे (सोनवडे), आत्माराम भुरवणे (तेर्ये), प्रकाश सोनार (बोरसुत), सचिन गावडे, प्रमोद गावडे (वाशी तर्फे संगमेश्वर), राम पवार, राजू पवार, प्रदिप कांबळे (फणसवळे), शांताराम पवार (देवाळे), वसंत तटकरे, संतोष मोरे, मंगेश गोसावी, गिता मोरे, गंगाराम टोपरे (मुचरी) इ. कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

हा मेळावा राजेंद्र सुर्वे, राजेंद्र पोमेडकर, संतोष भडवळकर, संकेत खामकर, विकास बेटकर, अनिल नांदळजकर, आण्णा पांचाळ, रघुनाथ भालेकर, महेश नांदळजकर, राजाराम गोवळकर, राजाराम इंदुलकर, सुभाष जाधव, राजेंद्रबोथरे, राजेंद्र घोसाळकर, सुधीर इदुलकर, दीपक चव्हाण, अजय साबळे, बाबू इंदुलकर, सुभाष जाधव, विनोद कदम, रमेश डिके, इ.

# सायबर सुरक्षा सप्ताह
# जनजागृती शिबीराचे आयोजन

बीड ।प्रतिनिधी

आज दिनांक ०३ नोव्हेंबर २०२३ रोजी सायंकाळी ०७.०० वाजता किमान समान कार्यक्रमाअंतर्गत आनंद एल. यावलकर प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड यांच्या मार्गदर्शनाखाली, हर्शवर्धन बालगृह, बीड येथे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व पोलिस अधीक्षक कार्यालय बीड येथील सायबर गुन्हा शाखा बीड यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर सुरक्षा बालकांचे अधिकार, त्यांच्या साठीच्या स्कीम, बाल स्नेही विधीसेवा या निमित्त जनजागृती शिबीर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.सदरील कार्यक्रमास मा. श्री. जी. जी सोनी साहेब, सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड यांची उपस्थित होती. त्यांनी सदरील कार्यक्रमाची प्रस्तावना करताना उपस्थित विद्यार्थ्यांना व तसेच विद्यालयातील शिक्षकांना सायबर गुन्हया बाबत जागरूक राहणे काळाची गरज असल्याचे सांगितले. अनोळखी लिंक केवळ महागच नव्हे तर आपल्याला भलत्याच ठिकाणी पोहोचवू शकते. फसवेगिरी करणाााया अमिषांपासुन सावध राहावे असे सांगितले.सदरील कार्यक्रमास ॲड. श्री. अमित प्रकाश रोकडे सहाय्यक विधी सहाय्य संरक्षक, लोकअभिरक्षक कार्यालय, बीड यांनी आपली मुले मोबाईल फोन वर किंवा सोशल मिडीयावर काय करतात किंवा त्यांचा वापर कसा करतात यावर पालकांचे काटेकारपणे लक्ष देणे आवश्यक आहे. ऑनलाईन गेमिंग मध्ये होणारे नुकसान याबाबत माहिती दिली. तसेच व्हॉट्सॲप, सोशल मिडीयाचा सध्या तरूण पिढीला व्यसन लागले आहे व त्याबाबत घ्यावयाची काळजी यावर उपाय याबाबत नागरिकांमध्ये जागरूकता असणे गरजेचे आहे.सायबर गुन्हेशाखा बीडचे सहाय्यक पोलिस निरीक्षक श्री. भारत काळे यांनी विद्यार्थ्यांना ऑनलाईन गेमिंगमध्ये होणारे मुलांचे नुकसान, सायबर गुन्हा काय असतो, तसेच तो गुन्हा आपल्याबाबत कशाप्रकारे घडू शकतो आणि त्यापासुन घेण्यात येणारी खबरदारी याबाबत माहिती सांगितली. तसेच ऑनलाईन एखादी वस्तू आपल्याला खरेदी करताना घ्यावयाची काळजी व हॅकरद्वारे आपली कशी फसवणूक होऊ शकते, तसेच ओटिपीद्वारे आपल्या बँक खात्यातील पैसे कशाप्रकारे काढून घेण्यात येतात. लिंक, ॲप व मोबाईल सजग होऊन वापरावे असे मार्गदर्शन केले. ओटीपी दिला म्हणजे आपण घराचा दरवाजा खोलून चोरी करण्याचे निमंत्रण दिले असे समजाविले. सदरील कार्यक्रमास सामाजिक कार्यकर्ते तसेच बालकल्याण समितीचे अध्यक्ष व जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे विधीदुत श्री. अशोक तांगडे यांनी हसत खेळत मुलांना मोबाईल हा आपल्यासाठी कशा प्रकारे चांगला व वाईट ठरू शकतो किंवा त्यांचा वापर मुले आपल्या उज्वल भविष्यासाठी कशा प्रकारे करू शकतात यांचे मार्गदर्शन केले.

# मराठा आरक्षणासाठी मराठवाड्यात आणखी चार जणांच्या आत्महत्या

## बीडमध्ये २ तर चाकूर, वैजापुरात एकाने घेतला गळफास

प्रतिनिधी । बीड

मराठा आरक्षणाचे आंदोलन तूर्त थांबले असले तरी आत्महत्यांचे दुष्टचक्र मात्र सुरूच आहे. गेल्या २४ तासांत याच कारणासाठी बीड, लातूर व छत्रपती संभाजीनगरातील चार जणांनी आत्महत्या केल्याचे उघडकीस आले आहे. बीड तालुक्यातील कोळवाडी येथे अमोल रोहिदास नांदे (२५) व कामखेडा येथे प्रेमराज किशोर जमदाडे (२२), चाकूर तालुक्यातील नांदगाव येथे तुकाराम रघुनाथ मोरे (५०) व वैजापूर तालुक्यातील भग्गाव येथील



कृष्णा दत्तू जगताप (२०) अशी मृतांची नावे आहेत. भग्गाव येथे कृष्णा जगताप या तरुणाने चिठ्ठीत मराठा आरक्षण न मिळाल्याने आत्महत्या करत असल्याचे म्हटले आहे.

### आरक्षण काही भेटत नाही?

चाकूर तालुक्यातील नांदगाव येथील तुकाराम मोरे हे अनेक वर्षांपासून सासरवाडी (नांदगाव) येथे वास्तव्यास होते. मोलमजुरी करून ते पोटाची खळगी भरत होते. त्यांना पत्नी, दोन मुले, नातवंडे आहेत. आष्टामोड येथे मराठा आरक्षणासाठी दहा गावांचे साखळी आंदोलन सुरू होते, त्यात त्यांचाही सहभाग असायचा. शुक्रवारी रात्री ते चिंताग्रस्त असल्याचे कुटुंबीयांना जाणवले. त्यांनी जेवणही केले नाही. 'उपोषण करून काही फायदा झाला नाही. सरकारने आरक्षण दिले नाही आणि वेळकाढूपणा केला', अशी प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली होती. शनिवारी सकाळी शेतात झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली.

**पान १ वरून...**

**घटना घडून ....**

येतात व संबंधित प्रकरणावर बोलतात याबद्दल बीडकर यांनी नाराजी व्यक्त करत रोष व्यक्त केला आहे

डॉक्टर भारतभूषण क्षीरसागर डॉक्टर दीपाताई क्षीरसागर डॉक्टर सारिका शिरसागर तसेच शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन बुळूक जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, बळीराम गवते यांच्यासह जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते त्यानंतर पालकमंत्री धनंजय मुंडे यांचा ताफा शहरातील संत भगवान बाबा चौकाजवळील भाजप जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या कार्यालयात पोहोचला त्या ठिकाणी त्यांनीझालेली तोडफोड व जाळ डोळ्याची पाहणी करून नंतर उत्तम नगर भागातील धैर्यशील सोळंके यांच्या बंगल्याची जाळपोळीची पाहणी करत सोळंके कुटुंबातील सदस्यांची चर्चा करून नंतर दुपारी पावणे तीन वाजता धनंजय मुंडे व इतर पदाधिकारी जालना रोडवरील समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष एडवोकेट सुभाष राऊत यांच्या सनराइज हॉटेलच्या ठिकाणी पोहोचले त्या ठिकाणी त्यांनी हॉटेलमध्ये झालेल्या नुकसानीची पाहणी करत सुभाष राऊत त्यांच्याशी संवाद साधला नंतर मंत्री धनंजय मुंडे हे माजी आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस अमरसिंहपंडित यांच्या साठे चौकातील शिवछत्र निवासस्थान पोहोचले त्य ठिकाणी त्यांनी अमरसिंह पंडित, विजयसिंह पंडित यांच्याशी झालेल्या घटनेबाब चर्चा केली तीस ऑक्टोबर रोजी बीडमध्ये मराठा आरक्षण आंदोलनाच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला हिंसक वळण मिळाले हो आंदोलकांनी माजी मंत्री जयदत्त शिरसागर आमदार संदीप क्षीरसाग डॉक्टर योगेश शिरसागर यांच्या निवासस्थानासह धैर्यशील सोळंके यांच्या उत्तम नगर मधील निवासस्थानाची तोडफोड करत जाळपो केली होती तसेच बार्शी रोडवरील राष्ट्रवादी भवन ला आग लावू नुकसान केले होते याबरोबरच माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्य संपर्क कार्यालयालाही आग लावून पेटवून देण्यात आले होते दरम्या त्यानंतर हा जमाव साठे चौकातील अमरसिंह पंडित यांच्या शिवछत्र निवासस्थानाकडे कोच करून आला होता. मात्र या ठिकाणी पोलिसांन थेट ॲक्शन घेत त्यांना वेळीच रोखल्यामुळे जमावतेतून निघून गेल होता त्यामुळे या ठिकाणी तोडफोड किंवा जाळपोळीची घटना घडल नव्हती दरम्यान आता मनोज जारंगे पाटील यांनी त्यांच्या आंदोल स्थगित केल्यानंतर जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी ५ नोव्हेंबर रोजी जिल्ह्यातील घडलेल्या जाळपोळ आणि तोडफोडीच्या ठिकाण जाऊन पाहणी करत तेथील माहिती जाणून घेत माध्यमांशी संवाद साधत आहेत.

# प्रपंच मराठा आरक्षणाचा - प्रा.गणेश चाळक

केज ।प्रतिनिधी

ज्या शूरवीर राज्याच्या विचाराने महाराष्ट्र घडला ते म्हणजे रयतेचे राजे श्री छत्रपती शिवाजी महाराज आठरा पगड जातींच्या मावळ्यांना सोबत घेऊन रयतेचे राज्य निर्माण केले त्यांना कोटी कोटी प्रणाम. महाराजांची विचारधारा जोपासण्याचे ज्यांनी काम केले ते म्हणजे महात्मा ज्योतिबा फुले या महान व्यक्तीस डोळ्यासमोर ठेवून जे विचारधारा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी चालवली त्यात बहुजन समाज उद्धाराचे कार्य केले.

परंतु आज महाराजा नंतर मराठ्यांची अवस्था काय झाली आहे कोणत्याही सिंहासनाचा पाया अनेक जणांच्या बलिदानाने घातला जातो अनेक मराठा सरदारांच्या बलिदानाने हे राज्य उभारले यांच्या पुढील वारसदारांना अनेक आर्थिक सामाजिक व शैक्षणिक संकटांना सामोरे जाताना आरक्षण मागण्याची वेळ आली हे त्या समाजाचे मराठ्यांचे दुर्दैव.

महाराष्ट्रात राहणारे मराठी कुणबी यांचा व्यवसाय शेती असून शेती व्यवसाय संकटात आला आहे हाच शेतकरी वर्ग सर्व समाजाचा पोशिंदा आहे शेतकरी कुणबी मराठा टिकला तर देश टिकेल व समाज टिकेल व वर्तमान काळात शेती व्यवसाय धोक्यात आला आहे याचे कारण म्हणजे येथील निसर्ग हा लहरी आहे कधी पाऊस जास्त पडल्यामुळे ओला दुष्काळ तर कधी कमी पाऊस पडल्यामुळे कोरडा दुष्काळ.दुष्काळ हा कुणब्यांच्या पाचवीला पुजला आहे की काय? त्यामुळे शेती व्यवसायात अपेक्षित उत्पन्न मिळत नाही वर्तमानात लोक संख्येची वाढ झपाट्याने झाली सर्व समस्येची जननी लोकसंख्या वाढ आहे तीस ते चाळीस एकर वाले जमीनदार संक्रमण अवस्थेत त्यांचे वारस दोन-तीन एकर वाले किंवा गुंठामंत्री झाले शेतीचे लहान लहान तुकड्यात विभाजन व लहरी निसर्ग यामुळे वर्षभर पुरेल एवढे उत्पन्न देखील शेती व्यवसायातून मिळत नाही तसेच महागाई शिक्षण व उच्च शिक्षण याचा वाढता खर्च आरोग्य सेवा (दवाखाना) याचा वाढता खर्च,मुला मुलींचे विवाह चंगळ वाद या खर्चाचा ताळमेळ बसवणे कठीण झाले या सर्व समस्यात मराठा कुणबी या जाती अडकल्या परंतु माळरानाची तीस ते पस्तीस एकर जमीन घेणारे कुणबी मोठेपणात गेले जमीनदार झाले परंतु गाव कुसाची बागायती जमीन घेणारे माळी मात्र ओबीसी आरक्षणात आले या बाबीमुळे मराठ्यांमध्ये मानसिक नैराश्य येऊन व्यसनाधीनता वाढली नोकरी नाही,शिक्षण नाही, मुलांचे विवाह नाही,जमीन नाही यात मराठा तरुणात मानसिक निराशा आली आहे म्हणून त्यांच्यात आशावाद निर्माण करण्यासाठी म्हणावेसे वाटते की. ये वक्त भी गुजर जायेगा

वरील सर्व परिस्थितीमुळे मराठा आरक्षणाची गरज निर्माण झाली आहे.



मराठा जातीचे खरे शत्रू कोण तर जातीचे जातीलाच मातीत घालित आहेत राजकारणात आपली खुर्ची वाचवण्या साठी वाटेल ते आरक्षणा बाबत संधी साधूबरळतात आता भूतकाळाच्या पार्श्वभूमीवर वर्तमान काळातील मराठा राजकीय पुढारी यांच्या बद्दल बरं लिहिण्याऐवजी खरं लिहिणार आहे गुळमट ऐवजी कडवट लिहीणार आहे आरक्षण देण्यासाठी व मागासले पणा सिद्ध करण्यासाठी राणे समिती नेमली तेंव्हाही समिती ओरडून सांगत होती की मराठा मागास आहेत त्यांना आरक्षणाची गरज आहे परंतु काळ वेळ कोणा साठी थांबत नाही आज हेच साहेब यांची भाषा बदलली ज्या समाजाच्या जीवावर मनोहर जोशींना हटवून मोठे झालात त्याच समाजाच्या जीवावर आपण राणे,कदम हे नेते जय भवानी व जय शिवाजी यांच्या घोषणा देऊन समाजाच्या जीवावर त्यांची ओळख निर्माण झाली तेच आता जातीला मातीत घालायला निघाले तर काही पुढारी वर्षानुवर्ष मराठ्यांच्या जीवावर सत्ता भोगून आरक्षण मुद्द्यावर मूग गिळून गप्प बसतात परंतु मराठा तरुण आता सभा, संमेलने,मोर्चे,आमरण उपोषणे प्रसंगी क्रांतिकारक भूमिका तसेच पुढार्यांना गाव नाकाबंदी वाट्टेल त्या मार्गाचा अवलंब करत आहेत मराठा योद्धा मनोज जरांगे यांनी त्यांना

फुल चार्जिंग केलंय आता माघार नाहीच

महात्मा फुले यांनी शूद्र जाती,शेतकरी,दलित उद्धाराचे कार्य करून इंग्रज सरकारकडे जाती च्या संख्येप्रमाणे कामे नेमावीत हीच खरी न्यायाची रीत त्यांच्या विचाराचा वारसा चालवणारे भुजबळ कमाई दार नेते म्हणून ओळख त्यांची निर्माण झालीओबीसी आरक्षणास धक्का न लावता आरक्षण द्याअशी गुळमट बतावणी करताना दिसून येतात आता धक्का तर लागणार च आहे हा आमचा अधिकार आहे आमच्या हिस्स्याचे आरक्षण आता जर डावलले तर न्यायालयातून ओबीसीचे आरक्षण रद्द होऊ शकते परंतु आम्ही मराठे यांनी आपले पालन पोषण केलेले असल्यामुळे आम्ही मराठा तसे करणार नाहीत एखादाच विदूषक वृत्तीचा गुणरत्न निघू शकतो तो कोणाकडे पाहतो हेच कळत नाही अशी विचार श्रेणी पुढे आली की, क्रांतिकारक तयार होत असतात.असेच सन्मान नीय साबळे समोर आले व त्यांनी क्रांती केली.

जो मराठ्यांना आरक्षण देणार त्याचेच सरकार येणारपूर्वीच्या सरकारने एस इ बी सी मधून दिलेल्या आरक्षणात मराठ्यांची घोर फसवणूक केली आमच्या पांढरपेशी पुढार्यांनी उघड्या डोळ्यांनी पाहिली ही फसवणूक त्यांच्या लक्षात आली नाही.ज्यामध्ये हा एस ई बी सी प्रवर्ग महाराष्ट्र राज्य पुरता मर्यादित होता हा प्रवर्ग केंद्रामध्ये नाही त्यामुळे मराठा तरुणांना केंद्रात खुल्या प्रवर्गातून जावे लागत होते.म्हणजेच मराठ्यांच्या पोरांनी आयएएस,आयपीएस होऊच नये हे षडयंत्र होते बरे झाले देवा न्यायालयाने आरक्षण रद्द केले.मराठा, कुणबी,कुळंबी एकच असा बॉम्बे हायकोर्ट याचा निकाल आहे.निजाम काळातील मराठवाड्यात अनेक अभिलेखात कुणबी नोंदी दिसून येत आहे तसेच मराठवाड्या तील मराठी व विदर्भ यातील कुणबी यांचे रोटी बेटीचे व्यवहार होतात म्हणून मराठा कुणबी एकच जात असून त्या जातीची व्यवसायावर आधारित उपजात आहे म्हणून ओबीसी प्रवर्गातून शिल्लक राहिलेल्या मराठ्यांना आरक्षण हवे आहे तो आमचाकायदेशीर अधिकार आहे तो आम्ही मिळवणारच मराठ्यांचे लाखोच्या संख्येने अनेक मोर्चे झाले,आंदोलने झाले विनंत्या झाल्या यातून काय फळ मिळाले तर न्यायालयात न टिकणारे व मराठा तरुणाची फसवणूक करणारे बोगस आरक्षण आता पन्नास टक्क्याच्या आतील मर्यादेत ओबीसीतूनच आरक्षण मिळावे मराठा योद्धा मनोज जरंगे पाटील यांचे आमरण उपोषण व त्यांच्या नेतृत्वाखालील भूतो न भविष्यती अशा विश्वविक्रमी समाजाचा मेळावा अंतरवली सराटी येथे पार पडला. लोकशाहीत शिकासंघटित व्हा व संघर्ष करा असा कानमंत्र डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिला आहे या कानमंत्राचा वापर मराठ्यांनी करून दाखवला आहे म्हणून खेदाने असे म्हणावेसे वाटते की -

सारं कसं छान आहे उत्कर्षाचे रान आहे
लोकशाहीचा बंगला आतून मात्र घाण आहे
तरी आपण म्हणतो आपला देश महान आहे

मराठा योद्धा मनोज जरंगे पाटील यांनी समाजाचे दुःख ओळखले व या समाजाला दिशा देण्या साठी त्यांचे नेतृत्व स्वीकारले त्यांची विचारश्रेणी स्पष्ट आहे पोटात एक ओठात एक अशी दुटप्पी विचार श्रेणी नसल्याने त्यांची विश्वविक्रमी रेकॉर्ड ब्रेक सभा अंतरवली सराटी येथे झाली जरांगे पाटलां च्या सभेसमोर इतर सभा फेल ठरल्या असा संदेश महाराष्ट्रात नव्हे तर देशात गेला त्यांनी केलेले आमरण उपोषण व सभा परत करत असलेले अमरण उपोषण यांच्या कार्याला समाज बांधवांचा कोटी कोटी सलाम ज्या मातापित्याने त्यांना जन्म दिला व समाजाच्या पदरात एक कोहिनूर हिरा टाकला म्हणून म्हणावेसे वाटते की पुत्र व्हावा ऐसा गुंडा त्याचा त्रिलोकी झेंडातरी मायबाप सरकारने आमचे बंधू मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणा ची तात्काळ दखल घेऊन उपोषण सोडवले व मराठ्यांना ओबीसी मध्ये आरक्षण देऊन छत्रपती च्या मावळ्यांची होणारी हेळसांड थांबवावी. सरकार जागे असेल तर राजकारण न करता मराठ्यांचा आरक्षणाचा लढा त्वरित थांबवावा व मनोज पाटील यांचा जीव वाचवून मराठ्यांना आरक्षण देऊन आपल्या सरकारने आनंद उत्सव साजरा करावा मनोज बंधू आपल्या प्रयत्नास कोटी कोटी प्रणाम शेवटी

लहरों से डरकर नौका पार नही होती कोशिश करने वालो की हार नही होती.

# ऐन दिवाळीच्या तोंडावर प्रवाशांचे हाल होणार?

# ६ नोव्हेंबर पासून एसटी संपाची हाक

मुंबई ।प्रतिनिधी

ऐन दिवाळीत एसटी बसने प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे हाल होण्याची शक्यता आहे. गुणरत्न सदावर्ते यांच्या नेतृत्वातील एसटी कष्टकरी जनसंघ या एसटी कामगार संघटनेने सोमवार, ६ नोव्हेंबरपासून संपाची हाक दिली आहे. या संपात मोठ्या प्रमाणावर कर्मचारी-कामगार सहभागी होणार असल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे एसटी प्रवाशांसह एसटी महामंडळालाही याचा फटका बसण्याची शक्यता आहे.

**राज्यभरात सर्वांनाच किफायतशीर असणारा वाहतुकीचा पर्याय म्हणजे एसटी. पण दरवर्षीप्रमाणेच याहीवर्षी एसटी महामंडळाच्या राज्य परिवहन प्राधिकरणाने आपल्या तिकीट दरात १० टक्क्यांची वाढ केली आहे. त्यामुळे ऐन दिवाळीत सामान्य माणसाच्या खिशाला आणखी एक कात्री लागणार आहे. मंगळवार, ७ नोव्हेंबरपासून ही दरवाढ लागू होणार असून २७ नोव्हेंबरपर्यंत असणार आहे.**

**राज्यात गेल्या काही दिवसांत महागाई खूपच वाढली आहे. पेट्रोल, डिझेल, गॅस यांसोबत भाज्या, कपडे यांचेही दर वधारले आहेत. त्यानंतर आता एसटीचेही भाडे वाढल्याने सामान्य माणसाच्या चिंतेत भर पडली आहे.**



### ऐन दिवाळीत संपाचा एसटीला फटका?

मागील काही महिन्यापासून एसटी महामंडळाकडे प्रवाशांचा ओढा वाढला आहे. त्याच्या परिणामी एसटी महामंडळाच्या उत्पन्नात वाढ होत आहे. दिवाळीच्या निमित्ताने आपल्या गावी जाणाऱ्या प्रवाशांसाठी एसटी महामंडळाकडून जादा वाहतूक चालवली जाते. त्यामुळे गणेशोत्सवानंतर दिवाळीच्या हंगामात एसटीच्या महसुलात वाढ होत असते. अशातच एसटीच्या कर्मचाऱ्यांनी पुन्हा दिवाळीत संप पुकारल्यास एसटी महामंडळाला मोठा आर्थिक फटका बसण्याची शक्यता आहे.

# कारखानदाराच्या तोडीस तोड ऊसाला भाव देणार -विक्रम (बप्पा) मुंडे

## रेणूका ग्रो इंडस्ट्रीजच्या ५ व्या गळीत हंगामाचा शुभारंभ

केज ।प्रतिनिधी

रेणूका ग्रो इंडस्ट्रीज गुळ उद्योग आसून सध्या बाजारपेठेत गूळाला योग्य भाव नसल्याने उद्योग अडचणीत आला आहे.तरी सुद्धा कारखानदाराच्या तोडीस तोड ऊसाला भाव देणार असल्याचे प्रतिपादन माजी जि.प.उपाध्यक्ष विक्रम (बप्पा) मुंडे यांनी केले आहे.रेणुका ग्रो इंडस्ट्रीज (गुळ उद्योग) (आंबळाचे बरड) च्या ५ व्या गळीत हंगामाचा शुभारंभ गुरूवार दि-२/११/२०२३ रोजी बीड जिल्हा परिषेदेचे माजी उपाध्यक्ष विक्रम (बप्पा) मुंडे यांच्या अध्येक्षतेखाली तर जिल्हा कृषी अधिकारी बी.के.जेजूरकर व बप्पासाहेब घुगे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. याप्रसंगी ह.भ.प.रतन महाराज सासुरेकर,ह.भ.प.श्रीराम महाराज विडेकर,ह.भ.प.लाड महाराज बरडकर,ह.भ.प.गणेश महाराज मुंडे यांनी उपस्थित राहून उद्योगास शुभेच्छा दिल्या.यावेळी जेष्ठ नेते सखाहरी (तात्या) गदळे,मुरलिधर (बप्पा) ढाकणे,बिभिषण पाळवदे,दहिफळचे सरपंच डॉ.शशिकांतजी दहिफळकर,एकुरक्याचे सरपंच प्रशांत केदार,माजी सरपंच डॉ.श्रीहरी धस,राजेभाऊ हाराळे,महादेव जाधवर,देवगावचे उपसरपंच सुभाष मुंडे,माजी उपसरपंच विठ्ठल मुंडे,केंद्रप्रमुख शंकर मुंडे सर,डी.एल.बापू नागरगोजे,पी.एस.नाना नागरगोजे,डी.डी.जोगदंड,पी.डी.मुरकुटे,कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक अंकुशराव



कलाणे,से.स.सोसायटीचे चेअरमण बळीराम चाळक,डॉ.धनराज पवार,ऋषीकेश (भैय्या)पटाईत,किशोर फड,किशोर देशमुख,चंद्रकांत कुलकर्णी,विशाल केंद्रे,रामभाऊ मुंडे,लिंबराज ढेंगे,विठ्ठल भोसले,बारीक भोसले यांच्यासह या भागातील ऊस उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.दरम्यान जि.प.सदस्य विजयकांत (भैय्या) मुंडे,अतुल (दादा) मुंडे,प्रा.माधूरीताई मुंडे रूपालीताई मुंडे,सुनिता पवार,कांचण कुलकर्णी यांनी उपस्थित मान्यवरांचा यथोचित सन्मान केला.यावेळी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बीड बायपास येथे ‘माई वृद्धाश्रमा’तर्फे दिवाळीनिमित्त गरीब कुटुंबीयांना कपडे वाटप



वंचित दुर्बल घटकातील मुला मुलींना कपडे दान करावेत, असे आवाहन लोकांना केले होते. या आवाहनाला मोठा प्रतिसाद मिळाला. कपडे दान करताना ते फाटके किंवा जास्त जुने नसावेत, घालण्याजोगे असावेत अशी अट ठेवण्यात आली होती. पण तरीही लोकांनी या आवाहनाला प्रचंड प्रतिसाद दिला.

**– मीरा वाघमारे माई वृध्दाश्रम संचालिका**

**प्रतिनिधी** । छत्रपती संभाजीनगर

बीड बायपास एमआयटी कॉलेजच्या जवळ वास्तव्यास असलेल्या बेघर कुटुंबातील आदिवासी बांधवांच्या मुलामुलींना एनजीओ बी. टी.ई. फाउंडेशन व माई वृध्दाश्रम तर्फे दिवाळी सणाचे औचित्य साधून ''एक हात मदतीचा' या नाविण्यपूर्ण उपक्रमांतर्गत उबदार कपडे देऊन माणुसकीची हाक देण्यात आली.

सण असो की उत्सव त्यांच्यासाठी तो गरिबांसाठी असूनही नसल्यासारखा असतो.फाऊंडेशनच्या सदस्यांनी या बेघर कुटुंबांच्या आर्थिक परिस्थितीची माहिती जाणून घेतली.त्यानंतर आज रोजी सकाळी त्यांची भेट घेऊन त्यांना नवीन कपडे, चादर व उबदार कपड्यांचे वाटप केले.थंडीच्या दिवसांत काही वयोवृद्ध आणि गरिब मुलांच्या अंगावर फाटके कपडे असतात. ही विदारक स्थिती पाहिल्यानंतर त्यांना कपडे मिळावेत. त्यांच्यासाठी काहीतरी करावं, असं वाटलं, असं संस्थेचे अध्यक्ष रामदास वाघमारे यांनी सांगितले.

बीड बायपास एमआयटी कॉलेजच्या वास्तव्यास असलेल्या या बेघर कुटुंबातील मुलामुलींना दिवाळीसारख्या सनानिमित्त कुणाकडून काही मदत मिळेल या आशेने शहरातील सिग्नलवर, चौकाचौकात भीक मागताना नजरेस दिसतात. परराज्यातून कामानिमित्त पोटाची खळगी भरण्यासाठी शहरात दिवाळीसारख्या सणात काही मदत मिळेल, पोटाची खळगी भरेल या आशेने बीड बायपास येथे आदिवासी भटक्या विमुक्त समाजातील ४५ जणांचे मुलांसह कुटुंब गेल्या अनेक दिवसांपासून आलेले आहे. कडाक्याच्या थंडीत खाली जमिनीवर पांघरण्यासाठी काही नाही, अंगावर कपडे नाही, जेवण नाही याची माहिती एनजीओ बोधी ट्री एज्युकेशनल फाऊंडेशन व माई वृध्दाश्रमाच्या संचालिका मीरा वाघमारे व त्यांच्या सदस्यांना कळताच सदस्यांनी या सर्व बेघर कुटुंबातील मुलामुलींना नवीन व जुन्या घालण्या जोगे कपड्यांचे व खाऊचे वाटप करून त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवले.

# मालमत्तेचे नुकसान व कोणाच्या जीवितास धोका होईल असे कृत्य करू नका

पोलीस महानिरीक्षक ज्ञानेश्वर चव्हाण यांचे आव्हान

अंबाजोगाई /प्रतिनिधी

अंबाजोगाई : आंदोलन करा पण लोकशाही व शांततेच्या मार्गाने करा कोणाच्याही जीवितास धोका निर्माण होईल ,अथवा, सार्वजनिक व इतर मालमत्तांचे नुकसान होईल असे कृत्य करू नका. सर्वांनी कायदा व सुव्यवस्था अबाधित राहील याची दक्षता घ्यावी. कोणीही कायदा हातात घेऊ नका असे आवाहन छत्रपती संभाजी नगर येथील पोलीस महानिरीक्षक ज्ञानेश्वर चव्हाण यांनी केले.

अंबाजोगाईत गुरुवारी दुपारी अप्पर पोलीस अधीक्षक यांच्या कार्यालयात ज्ञानेश्वर चव्हाण यांच्या उपस्थितीत शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी चव्हाण बोलत होते बोलताना म्हणाले. पोलीस महानिरीक्षक ज्ञानेश्वर चव्हाण म्हणाले की युवा पिढीला वास्तवाची जाणीव करून द्या त्यांना भरकटू देऊ नका होणाऱ्या आंदोलनाच्या माध्यमातून जनतेची गैरसोय असे कृत्य करू नका.

चुकीचे काम करणाऱ्यांची गय केली जाणार नाही. असा सज्जड दम ही त्यांनी दिला बीड जिल्ह्यात आतापर्यंत ११६ आरोपींना अटक करण्यात आली आहे. यात तरुणांचा मोठ्या प्रमाणात समावेश असल्याचे त्यांनी सांगितले आहे. जर युवा पिढी भरकटली तर त्यांच्या आयुष्याचे मोठे नुकसान होईल. यासाठी रस्त्यावर टायर जळणे अशांतता प्रस्थापित होईल असे प्रत्येक टाळण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी उपस्थितनी त्यांना विचारलेले प्रश्न व समस्यांची उत्तरे त्यांनी दिली. यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक कविता नेरकर शहर पोलीस ठाण्याचे निरीक्षक विनोद घोळवे ,ग्रामीणचे निरीक्षक पडवळ, माजी नगराध्यक्ष मोदी ,महादू मस्के, माजी आमदार पृथ्वीराज साठे, मानव लोकचे कार्यवाहक अनिकेतलोहीया , राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. नरेंद्र काळे , व्यापारी संघटनेचे धनराज सोळंकी ,रॉटरीचे अध्यक्ष स्वप्निल परदेशी मोहन शेख ,कल्याण काळे, सामाजिक कार्यकर्ते एड जयसिंग चव्हाण,एड संतोष लोमटे इस्माईल गवळी यांच्या सह सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

महिन्याभरात रविवार पेठेतील चौकीचे उद्घाटन होईल .

अंबाजोगाई शहरातील रविवार पेठ परिसरात असणाऱ्या निजामकालीन चौकीची दुरुस्ती करून एक महिन्यात ही चौकी कार्यान्वित होईल असे सांगून



शहरात एक नवीन पोलीस ठाणे वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी स्वतंत्र वाहतूक कक्ष सुरू करणार असल्याचे सांगितले. तसेच शहर व ग्रामीण पोलीस ठाण्यास जास्तीचा पोलीस फोज फाटा उपलब्ध करून देणार असल्याचे पोलीस महानिरीक्षक ज्ञानेश्वर चव्हाण यांनी सांगितले.

# शिरूर तालुक्यातील पंधरा ग्रामपंचायत निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज -पन्नास मतदान केंद्रावर २५० कर्मचाऱ्यांसह १५० पोलिसांची यंत्रणा- भारतकुमार पानसंबळ

शिरूर: तालुक्यातील पंधरा सार्वत्रिक ग्रामपंचायत निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज झाले असून आवश्यक कर्मचाऱ्यांसह पोलिस बंदोबस्तात आज कर्मचारी मतदान केंद्रावर रवाना होणार आहेत.एकूण वीस ग्रामपंचायतीसाठी तालुक्यात निवडणूक प्रक्रिया पार पडणार होती.परंतु मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणुन चार ग्रामपंचायतींनी निवडणूक प्रक्रियेवर बहिष्कार टाकला होता.ज्या मध्ये राक्षसभुवन, गोमळवाडा,शिरापुर धुमाळ आणि वडाळी यांचा सहभाग होता.तर बोरगांव चकला हि ग्रामपंचायत बिनविरोध झाली आहे.एकूण पन्नास मतदान केंद्रावर निवडणूक होणार असून त्यासाठी निवडणूक विभागाच्या वतीने दोनशे नियमित आणि पन्नास राखीव असे एकुण २५० कर्मचारी प्रक्रिया पार पाडणार आहेत.शिवाय आठ निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यासह आठ सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकारी आणि दहा संगणक ऑपरेटर कार्यान्वित असणार आहेत.निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पडण्याच्या दृष्टीने तगडा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून पाच पोलीस अधिकारी यांच्यासह ८५ पोलीस अंमलदार आणि ६० होमगार्ड असे एकूण दिडशे कर्मचारी तैनात राहणार आहेत. चौकट पिंपळनेर आणि आर्वी संवेदनशील मतदान केंद्र तालुक्यातील संवेदनशील मतदान केंद्र म्हणून पिंपळनेर आणि आर्वी यांचा समावेश आहे.मतदान प्रक्रियेत कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस यंत्रणा सज्ज झाली आहे.एकूण ३०६५० मतदार मतदानाचा



हक्क बजावणार असून त्यामध्ये स्त्री मतदार १४१८५ आणि पुरुष १६४६५ मतदारांचा समावेश आहे.

शांततेत मतदान प्रक्रिया पार पाडावी सार्वत्रिक ग्रामपंचायत निवडणुकीसाठी निवडणूक विभागाच्या वतीने संपूर्ण तयारी करण्यात आली असून प्रशासन सज्ज झाले आहे.दोन मतदान केंद्र सोडता एकही मतदान केंद्र संवेदनशील नसून नागरिकांनी लोकशाही मधील आपला मतदानाचा हक्क निडरपणे बजवावा.निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी सर्वांनी प्रशासनाला सहकार्य करावे. बाळू काका खेडकर - तहसीलदार,शिरूर कासार-चौकट स्कूल बस मधून मटपेट्यांचा प्रवास मराठा समाजाच्या आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर एस.टी महामंडळाच्या बसेस स्थानकात उभ्या असल्यामुळे या वर्षी मतपेट्यांचा आणि कर्मचाऱ्यांचा प्रवास स्कूल बस मधून होणार आहे.एकूण सहा स्कूल बसची व्यवस्था करण्यात आली असून त्यांच्या मदतीला शासकीय धान्याचा पुरवठा करणाऱ्या दोन टेम्पोचा देखील समावेश आहे.

# देगलूर महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धा संपन्न

देगलूर । प्रतिनिधी

अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभाग व फोरम ऑफ फ्री एंटरप्राईजेस यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५७वी श्री श्राफ स्मृती वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना आर्थिक आणि संबंधित विषयावर विचार करण्यास आणि बोलण्यास प्रोत्साहन देण्याबरोबरच त्यांना त्यांची बोलण्याची क्षमता प्रदर्शित करण्यास सक्षम बनवता येईल , या उद्देशाने पदवी अभ्यासक्रम शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती, सहभागी विद्यार्थ्यांनी वक्तृत्व स्पर्धेसाठी खालील विषयावर १)भारतीय रुपया जागतिक राखीव चलन म्हणून उदयास येण्यास तयार आहे का ? आणि हे लक्ष साध्य करण्यासाठी सरकारने कोणती पावले उचलली पाहिजेत ? २) २०२५ पर्यंत भारत ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनण्याच्या मार्गावर आहे का ? ३) रोजगारक्षम नसणे ही बेरोजगारी पेक्षा मोठी समस्या आहे का ? कौशल्य विकासासाठी भारताने अलीकडे उचललेली पावले. आपली मते मांडली प्रथम येणाऱ्यास दोन हजार पाचशे रुपये, द्वितीय येणाऱ्यास एक हजार पाचशे रुपये , तृतीय येणाऱ्यास एक हजार




रुपये, व सर्वोत्कृष्ट ५ स्पर्धकाना प्रमाणपत्र असे पारितोषिक देन्यात आले. सदरील वक्तृत्व स्पर्धेत प्रथम सूर्यवंशी गायत्री बंडू ,द्वितीय इंगळे योगेश माधवराव, तृतीय राचलवार संध्याराणी संजय गुणानुक्रमे या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली वक्तृत्व स्पर्धेचे पंच म्हणून डॉ. सुदाम लक्षमण, डॉ. माधव चोले, डॉ सुरेश काशिदे होते महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ प्रारंभी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले या कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार व उपप्राचार्य प्रा उत्तमकुमार कांबळे हे उपस्थित होते. वक्तृत्व स्पर्धेचे संयोजक म्हणून डॉ. अशोक टिपरसे काम पाहिले स्पर्धा यशस्वी होण्यासाठी डॉ. सर्जेराव रणखांब डॉ. संजय देवडे, योगिता अनमोड यांनी प्रयत्न केले.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT